# महाराष्ट्र शासन

## समाजकल्याण आयुक्तालय,
## महाराष्ट्र राज्य, पुणे

# मावक व नाहसं शाखेतील
# योजनांची पुस्तिका

| अनुक्रमणिका | | |
|---|---|---|
| अ.क्र | योजनांचे नाव | पृष्ठ क्र |
| १ | समाज कल्याण विभाग इतिहास | |
| २ | रमाई आवास योजना (ग्रामिण व शहरी) | |
| ३ | अत्याचारास बळी ठरणाऱ्या अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या कुटूंबातील सदस्यांना अर्थसहाय्य देण्याची योजना | |
| ४ | अत्याचारास बळी पडलेल्या व्यक्ती व त्यांचेवर / तिच्यावर अवलंबून असलेले व साक्षीदार यांना प्रवास / दैनिक भत्ता/ परिरक्षण खर्च/ आहार खर्च/वाहतूक खर्च | |
| ५ | नागरी हक्क संरक्षण अधिनियम अंमलबजावणी करीता यंत्रणा अस्पृश्यता निर्मुलनार्थ विविध कार्यक्रमाचे आयोजन करणे | |
| ६ | अस्पृश्यता निर्मुलनार्थ विविध कार्यक्रमाचे आयोजन करणे | |
| ७ | प्रधानमंत्री आदर्श ग्राम योजना (PMAGY) | |
| ८ | अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील मान्यवर व्यक्तींची स्मारके बांधणे सांस्कृतिक व ऐतिहासिक स्थळांचा विकास करण्यासाठी स्वयंसेवी संस्थांना अनुदान | |
| ९ | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त ऐतिहासिक स्थळांचा विकास करणे | |
| १० | आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन देण्यासाठी आर्थिक सहाय्य | |
| ११ | कन्यादान योजना | |
| १२ | ज्येष्ठ नागरिक धोरण अंमलबजावणी योजना | |
| १३ | वृध्दाश्रमांना राज्य शासनाचे अनुदान - सर्वसाधारण व मातोश्री वृध्दाश्रम | |
| १४ | मुख्यमंत्री वयोश्री योजना | |
| १५ | मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना | |
| १६ | राज्यातील तृतीयपंथीयांचे कल्याण व त्यांच्या हक्कांचे संरक्षण योजना | |
| १७ | हाताने मैला उचलण्याचे काम करुन घेण्यास प्रतिबंध करणे व त्यांचे पुर्नवसन करण्याबाबत अधिनियम २०१३ आणि त्यातील तरतुदी | |
| १८ | अंधश्रध्दा निर्मुलन अधिनियमाची अंमलबजावणी | |
| १९ | अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे | |
| २० | भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना | |
| २१ | राजर्षि छत्रपती शाहु महाराज यांचा जन्मदिवस दिंनाक २६ जुन दरवर्षी “सामाजिक न्याय दिन" म्हणून साजरा करणे | |
| २२ | मागासवर्गीय सहकारी गृहनिर्माण संस्थांना अनुदान | |
| २३ | सामाजिक न्याय विभागामार्फत देण्यात येणाऱ्या पुरस्कार / पारितोषिके<br>१. डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार<br>२. साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे पुरस्कार<br>३. पद्मश्री कर्मवीर दादासाहेब गायकवाड पुरस्कार<br>४. संत रविदास पुरस्कार<br>५. शाहू, फुले, आंबेडकर पारितोषिक<br>६. डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय प्राविण्य पुरस्कार | |

# समाज कल्याण विभाग - इतिहास

- **शासन निर्णय क्रमांक 4370, दिनांक 5 नोव्हेंबर 1928 अन्वये स्टार्ट समितीची स्थापना.**
- **सदर समितीमध्ये एकूण 10 सदस्यांचा समावेश. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचाही समावेश.**
- **समितीचा अहवाल 1930 साली शासनास सादर**
- **मागास समाजासाठी 1932 साली बॅकवर्ड क्लास वेलफेअर डिपार्टमेंटची स्थापना.**
- **श्री ओ एच बी स्टार्ट, आय. सी. एस., खात्याचे पहिले संचालक**
- **1947 साली संचालक, बॅकवर्ड क्लास वेलफेअर यांचे कार्यालय पुणे येथे स्थलांतरित.**
- **मा. श्री गणपती देवजी तपासे, मंत्री, उदयोग, मत्स्यव्यवसाय आणि मागासवर्गीयांचे कल्याण यांच्या हस्ते दिनांक 9.8.1947 रोजी पुणे येथील संचालनालयाच्या इमारतीची कोनशिला बसविण्यात आली.**
- **शासन निर्णय क्रमांक बीसीई 2857- डी, दिनांक 23 सप्टेंबर 1957 अन्वये मुख्य निरीक्षक प्रमाणित शाळा आणि संचालक, बॅकवर्ड क्लास वेलफेअर या दोन कार्यालयांचे एकत्रीकरण करुन पुणे येथे समाज कल्याण संचालनालयाची स्थापना**
- **1982 मध्ये आदिवासी विकास विभाग वेगळा**
- **1991 मध्ये महिला व बाल विकास विभाग वेगळा**
- **1999 मध्ये अपंग कल्याण विभाग वेगळा**
- **2000 मध्ये विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग वेगळा**
- **2011 समाज कल्याण संचालनालयाचे समाज कल्याण आयुक्तालयामध्ये रुपांतर**

## १. रमाई आवास योजना (ग्रामीण व शहरी)

**राज्य पुरस्कृत योजना**

**योजनेचे शासन निर्णय** :-

- शासन निर्णय क्र. बी.सी.एच.-2008/प्र.क्र.36/मावक-2, दि.15.11.2008
- शासन निर्णय क्र. बी.सी.एच.-2009/प्र.क्र.159/मावक-2, दि. 9.03.2010
- शासन निर्णय क्र. रआयो-2016/प्र.क्र.578/बांधकामे, दि. 30.9.2016 व 7.01.2017
- शासन निर्णय ग्राम विकास विभाग क्र. प्रआयो-2017/प्र.क्र.60/ योजना-10, दि. 14.7.2017
- शासन निर्णय क्र. रआयो-2017/प्र.क्र.357/बांधकामे, दि.1.10.2018 व दि. 13.02.2019

❖ **योजनेचा मुख्य उद्देश**

अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील बेघर व्यक्तींना स्वत:च्या मालकीचे घर उपलब्ध व्हावे.

❖ **योजनेचे प्रमुख अटी**

- अर्जदार अनुसूचित जाती / नवबौध्द प्रवर्गातील असावा.
- अर्जदाराचे महाराष्ट्रातील वास्तव्य किमान 15 वर्षे असावे.
- लाभार्थ्याच्या नावे स्वत:ची जागा / कच्चे घर असावे.
- यापूर्वी इतर कोणत्याही गृहनिर्माण योजनेचा लाभ घेतलेला नसावा.
- लाभार्थी सामाजिक, आर्थिक व जात सर्वेक्षण-2011 (SECC-2011) च्या प्राधान्यक्रम यादीच्या निकषाबाहेरील असावा.
- दिनांक 1.01.1995 रोजी राज्य शासन, महानगरपालिका, नगरपालिका,स्थानिक स्वराज्य संस्था, एमएमआरडीए, शासनाचे उपक्रम यांच्या जमिनीवर अतिक्रमण करुन त्या ठिकाणी राहात असून त्यांचे घरकुल / निवासस्थान सदर जमिनीवर असल्यास आणि त्यांना संरक्षित झोपडीदार म्हणून संरक्षण प्राप्त झालेले असल्यास, अशा लाभार्थ्यांसाठी 7/12 उतारा सादर करण्याची अट शासन निर्णय दिनांक 15.3.2016 नुसार शिथिल करण्यात आली आहे.

❖ **योजनेचे लाभाचे स्वरुप**

शासन निर्णय दिनांक 7.01.2017 नुसार योजनेत खालीलप्रमाणे सुधारणा केली आहे.

| क्र. | क्षेत्र | खर्चाची मर्यादा (रु.लाखात) | लाभार्थी हिस्सा | उत्पन्न मर्यादा (रु.लाखात) | घरकूलाचे क्षेत्रफळ |
|---|---|---|---|---|---|
| अ) | ग्रामीण | 1.32 | निरंक | 1.20 | 269 चौ.फु. |
| | डोंगराळ / नक्षलग्रस्त | 1.42 | निरंक | 1.20 | 269 चौ.फु. |
| ब) | न.पा./ न.प. | 2.50 | 7.5 टक्के | 3.00 | 323 चौ.फु. |
| क) | म.न.पा | 2.50 | 10 टक्के | 3.00 | 323 चौ.फु. |

❖ **संपर्क**

संबंधित जिल्हयाचे सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण

## २. अत्याचारास बळी ठरणाऱ्या अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या कुटूंबातील सदस्यांना अर्थसहाय्य देण्याची योजना

**केंद्र पुरस्कृत योजना** (50%**राज्य व** 50% **केंद्र**)

**शासन निर्णय**

- शासन निर्णय क्र.युटीए-1095/प्र.क्र.169/मावक-2, दि.24.09.1997
- शासन निर्णय क्र.युटीए-2016/प्र.क्र.298/सामासू, दि.23.12.2016

**योजनेचा मुख्य उद्देश**

नागरी हक्क संरक्षण अधिनियम-1955 अन्वये अस्पृश्यता पाळणे व ती पाळण्यास उत्तेजन देणे हा गुन्हा समजण्यात आला असून त्यासाठी शिक्षेची तरतूद करण्यात आलेली आहे. अनुसूचित जाती,अनुसूचित जमातीच्या व्यक्तीवर होणा-या अत्याचारांना पायबंद घालण्यासाठी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती (अत्याचारास प्रतिबंध) अधिनियम-1989 व सुधारीत नियम, 1995 हा कायदा लागू करण्यात आलेला आहे. जातीयतेच्या कारणावरुन अत्याचारास बळी पडलेल्या अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती सदस्यांना अर्थ सहाय्य देऊन त्यांचे पुर्नवसन करणे

**योजनेच्या प्रमुख अटी**

- जातीयतेच्या कारणावरुन अनुसूचित जाती,अनुसूचित जमातीच्या कुटूंबावर/ व्यक्तीवर अत्याचार झाल्यास सदर गुन्ह्याची नोंद नागरी हक्क संरक्षण अधिनियम-1955 व अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती (अत्याचारास प्रतिबंध) अधिनियम-1989 खाली होणे आवश्यक,
- वैद्यकीय प्रमाणपत्र (आवश्यक त्या गुन्ह्यात)
- जातीचा दाखला (सर्व गुन्हे)

**लाभाचे स्वरुप**

- रु.0.85 लक्ष ते रु.8.25 लक्ष

**संपर्क**

संबंधित जिल्हयाचे सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण

## ३. अत्याचारास बळी पडलेल्या व्यक्ती व त्यांचेवर / तिच्यावर अवलंबून असलेले व साक्षीदार यांना प्रवास / दैनिक भत्ता/ परिरक्षण खर्च/ आहार खर्च/ वाहतूक खर्च

**राज्य पुरस्कृत**

**शासन निर्णय**

- नागरी हक्क संरक्षण कायदा,1955
- अनुसूचित जाती,अनुसूचित जाती (अत्याचार प्रतिबंध),1989
- शासन निर्णय क्र.युटीए-2010/प्र.क्र.14/सुधार-1, दि.20/10/2010

**योजनेचा मुख्य उद्देश**

जातीयतेच्या कारणावरुन अत्याचाराला बळी पडलेले त्यांच्यावर अवलंबून असलेले व साक्षीदार यांना अर्थसहाय्य देऊन त्यांचे पुनर्वसन करणे.

**लाभार्थी पात्रतेचे निकष**

जातीयतेच्या कारणावरुन अनुसुचित जाती, अनुसूचित जमातीच्या कुटूंबावर/व्यक्तीवर अत्याचार झाल्यास सदर गुन्हयाची नोंद नागरी हक्क संरक्षण अधिनियम 1955 व अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती (अत्यांचारास प्रतिबंध ) अधिनियम 1989 खाली होणे आवश्यक आहे.

**लाभाचे स्वरुप**

- अत्याचारास बळी पडलेल्या व्यक्ती व त्यांचेवर /तिच्यावर अवलंबून असलेले व साक्षीदार यांना प्रवास / दैनिक भत्ता/ परिरक्षण खर्च/आहार खर्च/वाहतूक खर्च शासनाच्या प्रचलित नियमानुसार
- वकील फी व फिर्यादी यांस चहा, नाष्टा शासनाच्या प्रचलित नियमानुसार

**संपर्क**

संबंधित जिल्हयाचे सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण

## ४. नागरी हक्क संरक्षण अधिनियम अंमलबजावणी करीता यंत्रणा अस्पृश्यता निर्मुलनार्थ विविध कार्यक्रमाचे आयोजन करणे

**केंद्र पुरस्कृत योजना (50%राज्य व 50% केंद्र)**

**शासन निर्णय**

- नागरी हक्क संरक्षण कायदा,1955
- अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम,1989.

**योजनेचा मुख्य उद्देश**

अस्पृश्यता निर्मुलन करणे व समाजाचे प्रबोधन करणे.

**लाभाचे स्वरुप**

- तालुका स्तरावर शिबीर :- अस्पृश्यता निर्मुलनार्थ प्रत्येक तालुक्यामध्ये ग्रामसेवक,तलाठी, पंचायत समिती सदस्य इ.साठी वर्षातून तीन शिबीरे आयोजित करण्यासाठी रु 12000/- इतके अनुदान पंचायत समितीला देण्यात येते.
- खेडेगांवाना पारितोषिक :- प्रत्येक जिल्हयामध्ये अस्पृश्यता निर्मुलनार्थ उत्कृष्ठ कार्य करणाऱ्या खेडेगांवाना परितोषिक देण्यात येते. प्रथम पारितोषिक रू 3000/-व व्दितीय पारितोषिक रु 2000/-
- निबंध स्पर्धा :- अस्पृश्यता निर्मुनार्थ प्रत्येक जिल्हयातील विदयालय व महाविदयालयामध्ये निबंध स्पर्धा आयोजन करणे. प्रथम परितोषिक रु 1000/-, व्दितीय रु 750/- तृतीय रु 500/-
- वक्तृत्व स्पर्धा **:-** अस्पृश्यता निर्मुलनार्थ प्रत्येक जिल्हयातील विदयालय व महाविदयालमध्ये वक्तृत्व स्पर्धा आयोजित करणे. प्रथम पारितोषिक रु 1000/- व्दितीय क्र.रु 750/- तृतीय रु 500/-

**संपर्क**

संबंधित जिल्हयाचे सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण

## ५. अस्पृश्यता निर्मुलनार्थ विविध कार्यक्रमाचे आयोजन करणे

**राज्य पुरस्कृत योजना**

**शासन निर्णय**

- नागरी हक्क संरक्षण कायदा,1955
- अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम,1989.

**योजनेचा मुख्य उद्देश**

अस्पृश्यता निर्मुलन करणे व समाजाचे प्रबोधन करणे.

**लाभाचे स्वरुप**

- विभागीय कार्यशाळा/समता परिषद :- प्रत्येक विभागामध्ये अस्पृश्यता निर्मुलनार्थ काम करणारे कार्यकर्ते, पदाधिकारी यांची कार्य शाळा घेणे यासाठी प्रत्येक विभागाला रु 50000/-इतका खर्च.
- तालुका स्तरावर शिबीर **:-** अस्पृश्यता निर्मुलनार्थ प्रत्येक तालुक्यामध्ये ग्रामसेवक,तलाठी, पंचायत समिती सदस्य इ.साठी वर्षातून तीन शिबीरे आयोजित करण्यासाठी रु 12000/- इतके अनुदान पंचायत समितीला देण्यात येते.
- खेडेगांवाना पारितोषिक **:-** प्रत्येक जिल्हयामध्ये अस्पृश्यता निर्मुलनार्थ उत्कृष्ठ कार्य करणाऱ्या खेडेगांवाना परितोषिक देण्यात येते. प्रथम पारितोषिक रू 3000/-व व्दितीय पारितोषिक रु 2000/-
- निबंध स्पर्धा **:-** अस्पृश्यता निर्मुनार्थ प्रत्येक जिल्हयातील विदयालय व महाविदयालयामध्ये निबंध स्पर्धा आयोजन करणे. प्रथम परितोषिक रु 1000/-, व्दितीय रु 750/- तृतीय रु 500/-
- वक्तृत्व स्पर्धा **:-** अस्पृश्यता निर्मुलनार्थ प्रत्येक जिल्हयातील विदयालय व महाविदयालमध्ये वक्तृत्व स्पर्धा आयोजित करणे. प्रथम पारितोषिक रु 1000/- व्दितीय क्र.रु 750/- तृतीय रु 500/-

**संपर्क**

संबंधित जिल्हयाचे सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण

## ६. प्रधानमंत्री आदर्श ग्राम योजना (PMAGY)

**केंद्र पुरस्कृत (100 % केंद्र हिस्सा)**

**शासन निर्णय**

शासन निर्णय क्र.प्रगायो-2019 / प्र.क्र.103 / अजाक, दि.26.08.2019

**योजनेचा मुख्य उद्देश**

प्रधानमंत्री आदर्शग्राम योजनेसोबतच राज्य शासनाच्या विविध विभागांमार्फत राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजनांची सदर गावांमध्ये अंमलबजावणी करुन सदर गावांचा सर्वांगिण विकास करणे , संबंधित गावात मुलभूत सोयीसुविधा उपलब्ध करणे व गावातील सर्व नागरीकांचे जीवनमान उंचावणे तसेच केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या इतर योजनांशी मेळ घालून (Convergence) योजना राबविणे

**योजनेच्या प्रमुख अटी**

अनुसुचित जातीची 50% पेक्षा जास्त लोकसंख्या असलेली गावे

**लाभाचे स्वरुप**

गावाच्या सर्वांगीण विकासासाठी पिण्याच्या पाण्याची सुविधा व मल:निस्सारण, शिक्षण, आरोग्य व पोषण आहार सुविधा, सामाजिक संरक्षण, ग्रामीण रस्ते व गृहनिर्माण, वीज पुरवठा व गॅस जोडणी, कृषीविषयक उपाययोजना, वित्तीय पुरवठयाच्या सोयीसुविधा, संगणकीकरण सुविधा ( डिजिटायझेशन ) व रोजगार निर्मिती व कौशल्य विकास या बाबींवर / घटकांवर काम करण्यात येते. तसेच गावाच्या सर्वांगिण विकासासाठी (शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक अभिसरण) योजना.

**संपर्क**

संबंधित जिल्हयाचे सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण

## ७. अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील मान्यवर व्यक्तींची स्मारके बांधणे सांस्कृतिक व ऐतिहासिक स्थळांचा विकास करण्यासाठी स्वयंसेवी संस्थांना अनुदान

**राज्य पुरस्कृत योजना**

**शासन निर्णय**

- सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,शासन निर्णय दि.5 नोव्हेंबर,2020
- शासन ज्ञापन दिनांक 5 ऑक्टोबर, 2021

**योजनेचा मुख्य उद्देश**

अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील मान्यवर व्यक्तींचे स्मारक बांधणे, तसेच अनुसूचित जातीसाठी सांस्कृतिक व ऐतिहासिकदृष्टया महत्व असलेल्या स्थळांचा विकास करणे, व अनुसूचित जातीच्या सांस्कृतिक व नीतीमुल्यांवर आधारित विकास साधणा-या प्रकल्पांसाठी स्वयंसेवी संस्थांना अनुदान मंजुर करणे

**योजनेच्या प्रमुख अटी**

- धर्मादाय कायदा किंवा कंपनी कायदा (कलम-25) किंवा सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट खाली नोंदणीकृत असणे
- सार्वजनिक क्षेत्रातील काम कमीत कमी तीन वर्षे काम केलेले असावे.
- मागील तीन वर्षाचा नियंत्रक व महालेखपरिक्षक, भारत सरकार यांच्या पॅनलवरील सनदी लेखापालाकडून केलेला लेखापरिक्षण अहवाल प्रस्तावासोबत सादर करणे अनिवार्य आहे.
- भविष्यात प्रकल्पाची दुरुस्ती व देखभालीसाठी संबंधित स्वयंसेवी संस्था आर्थिकदृष्टया सक्षम असावी (बंधपत्र आवश्यक).
- संस्थेतील दोन पेक्षा जास्त विश्वस्त एकाच कुटूंबातील/ रक्त नाते संबंधातील नसावेत (शपथपत्र आवश्यक).
- संस्थेचे पदाधिकारी व सदस्य अनुसूचित जाती किंवा नवबौध्द प्रवर्गातील असावा.
- महाराष्ट्रातील फक्त अनुसूचित जाती व अनुसूचित जातीतून धर्मांतरीत नवबौध्द या योजनेसाठी पात्र राहतील. महाराष्ट्रातील इतर जाती व प्रवर्गातून बौध्द धर्मांतरीत व्यक्ती मार्फत चालविण्यात येणा-या स्वयंसेवी संस्था सदर योजनेसाठी अपात्र राहतील.
- संस्थेचे पदाधिकारी व सदस्य भविष्यात कधीही बिगर अनुसूचित जातीचे असणार नाहीत व प्रकल्पांचा जास्तीत जास्त लाभ हा अनूसूचित जातीतील व्यक्तींनाच होईल याबाबत संस्थेचे अध्यक्ष व सचिव यांचे संयुक्त शपथपत्र सादर करणे बंधनकारक आहे.
- संस्थेच्या सर्व सदस्यांना जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र बंधनकारक राहील.
- शासकीय मानकानुसार वास्तूमध्ये प्रथमोपचार सुविधा असणे संस्थेस बंधनकारक राहील.
- प्रकल्पास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून एक वर्षाच्या कालावधीत प्रकल्पाची निवीदा प्रक्रिया पूर्ण होऊन बांधकाम सुरु होणे आवश्यक राहील. तसेच स्वयंसेवी संस्थेने सार्वजनिक बांधकाम विभागाने निश्चित केलेल्या नियोजित प्रकल्पाच्या बांधकामाच्या कालावधीत सदर प्रकल्प पूर्ण करणे संस्थेस बंधनकारक राहील.
- शासनाच्या पुर्व परवानगीशिवाय नियोजित प्रकल्पांतर्गत असलेल्या इमारतींचे बांधकाम कोणत्याही कारणास्तव इतर संस्थेस/ व्यक्तीस हस्तांतरीत करता येणार नाही वा भाडेतत्वावर देता येणार नाही.

**लाभाचे स्वरुप**

प्रकल्प खर्चाच्या 90 टक्के अनुदान

**संपर्क**

संबंधित जिल्हयाचे सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण

## ८. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे १२५ वे जयंती वर्ष सन २०१५-१६ हे वर्ष समता व सामाजिक न्याय वर्ष साजरे करणे.

**राज्य पुरस्कृत**

**शासन निर्णय**

- शासन निर्णय क्र. सान्यावि-2015/ प्र.क्र.163/बांधकामे, दि.9 ऑक्टोबर, 2015
- शासन निणय दिनांक 24 मार्च, 2017
- शासन निर्णय दिनांक 12 ऑक्टोबर, 2017
- शासन निर्णय दिनांक 14 मार्च, 2018

**योजनेचा मुख्य उद्देश**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 125 जयंती वर्षानिमित्त त्यांच्या जिवनाशी निगडीत असलेली घटनास्थळे व महत्वाच्या ऐतिहासिक स्थळांना पर्यटनाचा दर्जा देऊन विकास करण्यासाठी ठिकाणांची निवड करणे व अनुदान मंजूर करण्यात येते.

**योजनेच्या प्रमुख अटी**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जिवनाशी निगडीत ऐतिहासिक स्थळ असणे आवश्यक आहे.

**लाभाचे स्वरुप**

मंजूर कामासाठी 100 टक्के अनुदान

**संपर्क**

संबंधित जिल्हयाचे सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण

## ९. आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन देण्यासाठी आर्थिक सहाय्य

**केंद्र पुरस्कृत (50%राज्य व 50% केंद्र)**

**शासन निर्णय**

- शासन निर्णय दिनांक 30/01/1999
- शासन निर्णय दिनांक 1/02/2010

**योजनेचा मुख्य उद्देश**

समाजातील जातीव्यवस्था नष्ट होवून सामाजिक समता प्रस्थापित होणेकरिता अस्पृश्यता निवारणाच्या कार्याला गती मिळण्यासाठी प्रोत्साहन म्हणून आंतरजातीय विवाहीत जोडप्यांना अर्थसहाय्य देणे

**योजनेच्या प्रमुख अटी**

- लाभार्थी हा महाराष्ट्रातील कायमस्वरुपी रहिवाशी असावा.
- लाभार्थी , विवाहीत जोडप्या पैकी एक व्यक्ती हा अनुसुचित जाती/अनुसुचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील व दुसरी व्यक्ती सुवर्ण, हिंदू, लिंगायत, जैन किंवा शीख प्रवर्गातील असावी.
- विवाह नोंदणीकृत असावा.
- विवाह समयी वराचे वय 21 वर्षे व वधूचे वय 18 वर्षे पूर्ण असावे.
- दोन प्रतिष्ठित व्यक्तीची शिफारस पत्रे आवश्यक

**लाभाचे स्वरुप**

रुपये 50,000/- प्रती दाम्पत्य (जोडपे)

**संपर्क**

संबंधित समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद

## १०.कन्यादान योजना

**राज्य पुरस्कृत**

**शासन निर्णय**

- शासन निर्णय क्र.सावियो-2003/प्र.क्र.60/सुधार-1,दि.24/12/2003
- शासन निर्णय क्र.सावियो-2005/प्र.क्र.41/सुधार-1, दिनांक 18 डिसेंबर 2008
- शासन निर्णय क्र.सावियो-2015/प्र.क्र.105/सामासू, दि.15/10/2016

**योजनेचा मुख्य उद्देश**

विवाह प्रसंगी पालकांवरील आर्थिक भार कमी होणेसाठी अनुसूचित जातीच्या व्यक्तींना आर्थिक सहाय्य उपलब्ध करुन देणे

**योजनेच्या प्रमुख अटी**

- वधु व वर हे महाराष्ट्र राज्याचे कायमस्वरुपी रहिवाशी असावेत.
- वराचे वय 21 वर्ष व वधुचे वय 18 वर्ष पुर्ण असावे.
- सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले जातीचे प्रमाणपत्र.
- वधु-वर यांच्या प्रथम विवाहासाठी हे अनुदान अनुज्ञेय राहील.तथापी,विधवा महिलेस दुसऱ्या विवाहासाठी सुध्दा लाभ देण्यात येईल
- नवदांपत्यांतील वधू/वर यापैकी दोन्ही किंवा एक जण हे अनुसूचित जाती (नवबौध्द) प्रवर्गातील असावा.
- बाल विवाह प्रतिबंध कायदा व हुंडा प्रतिबंध कायदयांतर्गत असलेल्या कोणत्याही कलमाचा भंग या दाम्पंत्य/कुटूंब यांचे कडून झालेला नसावा, या बाबत लेखी प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक
- सामुहिक विवाह सोहळ्यासाठी कमीत-कमी 10 दाम्पत्यांचे विवाह एकाच वेळी संस्थेने आयोजित करणे आवश्यक

**लाभाचे स्वरुप**

- रु.20,000/- इतकी रक्कम वधुचे वडील, आई किंवा पालक यांचे नांवे रेखांकित धनादेशाद्वारे विवाहाचे दिवशी देण्यात येते.
- सामुहिक विवाह सोहळयाचे आयोजक संस्था वा संघटनांना प्रत्येक जोडप्यामागे रु.4000/- असे प्रोत्साहनपर अनुदान देण्यात येते.

**संपर्क**

संबंधित जिल्हयाचे सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण

## ११.ज्येष्ठ नागरिक धोरण अंमलबजावणी योजना

**राज्य पुरस्कृत**

**शासन निर्णय**

- केंद्र शासनाचा आई, वडील व ज्येष्ठ नागरिक यांच्या चरितार्थ व कल्याणासाठी अधिनियम, 2007
- राज्य शासनाचा आई, वडील व ज्येष्ठ नागरिक यांच्या चरितार्थ व कल्याणासाठी नियम, 2010
- शासन निर्णय क्र. ज्येष्ठना-2016/प्र.क्र.71/सामासू, दिनांक 9 जुलै, 2018

**योजनेचा मुख्य उद्देश**

ज्येष्ठ नागरिकांचे समाजातील स्थान विचारात घेता त्यांना वृध्दापकाळ चांगल्या तऱ्हेने घालविता यावा, समाजामध्ये त्यांचे जीवन सुसह्य व्हावे, शारिरीक व मानसिक आरोग्य सुस्थितीत रहावे, वृध्दापकाळामध्ये त्यांच्या आर्थिक क्षमता, कामाचा हक्क, शिक्षणाचा हक्क व सार्वजनिक मदत पुरविणे.

**योजनेच्या प्रमुख अटी**

- महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा
- वय 60 वर्षे व त्यापुढील वयाचे सर्व नागरिक

**लाभाचे स्वरुप-**

- रुग्णालयांमध्ये 5 टक्के जागा राखीव
- एसटी बस प्रवास सवलत
- शासकीय वैद्यकीय सेवा देणाऱ्या रुग्णालयात ज्येष्ठ नागरिकांसाठी वैद्यकीय सेवा देण्यात येते
- रुग्णालयामध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी स्वतंत्र चिकित्सा विभाग
- पोलीस विभागामार्फत ज्येष्ठ नागरिकांसाठी  विनाशुल्क हेल्पलाईन सेवा
- राज्यातील ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या व तक्रारींचे निवारण करणेसाठी जनसेवा फौंडेशन पुणे या स्वयंसेवी संस्थे मार्फत राष्ट्रीय विनाशुल्क हेल्पलाईन सेवा (Toll Free Number 14567)
- आरोग्य कवच विमा - राज्यातील 65 वर्षावरील ज्येष्ठ नागरीकांना मोफत आरोग्य निवडक उपचार, विशिष्ट तपासण्या व पाठपुरावा सेवा (प्रस्तावित)

**संपर्क**

संबंधित जिल्हयाचे सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण

# १२. वृध्दाश्रमांना राज्य शासनाचे अनुदान

## अ) सर्वसाधारण वृध्दाश्रम (२९)

❖ **शासन निर्णय**

- ❑ शासन निर्णय क्र. क्र.एसडब्लू-१०६२-४४९४५/ एन, दि.२०/०२/१९६३
- ❑ शासन निर्णय क्र. बीसीएच-२०१८/प्र.क्र.७९/शिक्षण-२, दि.३/३/२०१९

❖ **योजनेचा मुख्य उद्देश**

महिला वृध्द, निराश्रित, दिव्यांग पिडीतांना भोजन, निवास, आश्रय, इत्यादी सोयी-सुविधा पुरविणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना परिपोषणासाठी अनुदान देणे.

❖ **योजनेच्या प्रमुख अटी**

- ❑ महाराष्ट्रातील रहिवासी
- ❑ निराधार पुरुष वृध्दाचे वय ६० वर्षे व महिला वृध्दाचे वय ५५ वर्ष

❖ **लाभाचे स्वरुप**

परिपोषण अनुदान - अनुदानित वृध्दाश्रमातील प्रवेशित वृध्दांकरीता भोजन, निवास व औषधोपचार इत्यादी करीता दरमहा दरडोई रुपये १५००/- अनुदान.

## ब) मातोश्री वृध्दाश्रम (२३)

❖ **शासन निर्णय**

- ❑ शासन निर्णय क्र.क्र.एसडब्लू-१०६२-४४९४५/ एन, दि. २०/०२/१९६३
- ❑ शासन निर्णय क्र., क्र. संकीर्ण-१०९५/ के.नं. १६०/सुधार-२, दिनांक १७/११/१९९५
- ❑ शासन निर्णय क्र. बीसीएच-२०१८/प्र.क्र.७९/शिक्षण-२, दि.६/३/२०१९
- ❑ शासन निर्णय क्र. ज्येष्ठना-२०२०/प्रक्र.०२/सामासु, दि. २५/०७/२०२४

❖ **योजनेचा मुख्य उद्देश**

महिला वृध्द, निराश्रित, दिव्यांग पिडीतांना भोजन, निवास, आश्रय, इत्यादी सोयी-सुविधा पुरविणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना परिपोषणासाठी अनुदान देणे.

❖ **योजनेच्या प्रमुख अटी**

- ❑ लाभार्थी महाराष्ट्रातील रहिवासी असावा.
- ❑ निराधार पुरुष वृध्दाचे वय ६० वर्षे व महिला वृध्दाचे वय ५५ वर्ष असावे.

❖ **लाभाचे स्वरुप**

- ❑ परिपोषण अनुदान - अनुदानित वृध्दाश्रमातील प्रवेशित वृध्दांकरीता भोजन, निवास व औषधोपचार इत्यादी करीता दरमहा दरडोई रुपये १५००/- अनुदान.
- ❑ कर्मचारी पदे - शासन निर्णय दि.२५ जुलै, २०२४ नुसार २३ मातोश्री वृध्दाश्रमांसाठी प्रत्येक १४ पदे याप्रमाणे एकूण ३२२ मानधनावरील पदे बाहययंत्रणेकडून उपलब्ध करुन घेण्यास मान्यता देण्यात आली आहे.

❖ **संपर्क**

- ❑ ग्रामीण भागासाठी संबंधित जिल्ह्याचे जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद
- ❑ शहरी भागासाठी संबंधित जिल्ह्याचे सहायक आयुक्त, समाजकल्याण

## १३. मुख्यमंत्री वयोश्री योजना (राज्य)

❖ **शासन निर्णय –**

१) शासन निर्णय क्र.ज्येष्ठना-२०२२/प्र.क्र.३४४/सामासु, दि. ६.०२.२०२४

२) शासन निर्णय क्र. ज्येष्ठना-२०२२/प्र.क्र.३४४/सामासु,दि. ११.०३.२०२४

३) शासन निर्णय क्र. ज्येष्ठना- २०२२/ प्र.क्र.३४४/ सामासु, दि. १९.०८.२०२४

❖ **योजनेचा मुख्य उद्देश –**

राज्यातील वय ६५ वर्षे व त्यावरील ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या दैनंदिन जीवनात सामान्य स्थितीत जगण्यासाठी आणि त्यांना वयोमानपरत्वे येणारे दिव्यांगत्व, अशक्तपणा यावर उपाययोजना करण्यासाठी आवश्यक सहाय्य साधने/ उपकरणे खरेदी करणेकरीता,तसेच मन:स्वास्थ केंद्र, योगोपचार केंद्र इत्यादी व्दारे त्यांचे मानसिक स्वास्थ अबाधित ठेवणे

❖ **योजनेच्या प्रमुख अटी –**

१) ज्येष्ठ नागरिक /लाभार्थी महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.

२) लाभार्थ्याचे वय ६५ वर्षे पूर्ण असावे.

३) एकूण लाभार्थ्यांपैकी ३० टक्के महिला असणे आवश्यक आहे.

४) लाभार्थ्याकडे पात्रतेसाठी जिल्हा प्राधिकरणाकडून प्रमाणपत्र किंवा बीपीएल रेशन कार्ड / राष्ट्रीय सामाजिक सहाय्य कार्यक्रमांतर्गत इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजनेअंतर्गत किंवा राज्य / केंद्रशासित सरकारच्या पेन्शन योजनेअंतर्गत वृध्दापकाळ निवृत्तीवेतन मिळाल्याचा पुरावा आवश्यक आहे.

५) लाभार्थ्याचे कौटुंबिक वार्षिक उत्पन्न रु. २ लक्ष च्या मर्यादेत असणे आवश्यक आहे.

६) मागील ३ वर्षात स्थानिक स्वराज्य संस्था आणि सरकारव्दारे नियंत्रित सार्वजनिक उपक्रमांसहित कोणत्याही सरकारी स्त्रोतांकडून तेच उपकरण विनामूल्य प्राप्त केले नसावे.

❖ **लाभाचे स्वरुप –**

एकवेळ एकरकमी रु.३०००/- च्या मर्यादेत ज्येष्ठ नागरिकांच्या आधार संलग्न वैयक्तिक बॅक खात्यात थेट लाभ वितरण प्रणालीव्दारे अर्थसहाय्य उपलब्ध करुन देण्यात येतात.

❖ **आवश्यक कागदपत्रे –**

१) आधारकार्ड / मतदान कार्ड

२) राष्ट्रीयकृत बँकेची बँक पासबुक झेरॉक्स

३) पासपोर्ट आकाराचे २ फोटो

४) स्वयंघोषणापत्र

५) शासनाने ओळख पटविण्यासाठी विहित केलेली अन्य कागदपत्रे

❖ **अंमलबजावणी यंत्रणा –**

| **शहरी क्षेत्रासाठी** | | | **ग्रामीण क्षेत्रासाठी** | |
|---|---|---|---|---|
| **अध्यक्ष** | **आयुक्त महानगरपालिका** | | **अध्यक्ष** | **जिल्हाधिकारी** |
| सदस्य | वैद्यकीय अधिकारी, महानगरपालिका, महिला व बालविकास अधिकारी | | सहअध्यक्ष | मुख्य कार्यकारी अधिकारीजिल्हा परिषद, |
| | | | सदस्य | जिल्हा आरोग्य अधिकारी,जिल्हा परिषद जिल्हा शल्य चिकित्सक,आरोग्य विभाग सहसंचालक / समकक्ष अधिकारी, महिला व बालविकास |
| सदस्य सचिव | सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण | | सदस्य सचिव | सहाय्यक आयुक्त, समाज कल्यण / जिल्हा समाज कल्याण अधिकारी |

# १४. मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना (राज्य)

❖ **शासन निर्णय -**

- शासन निर्णय क्र.ज्येष्ठना-२०२४/प्र.क्र.१८९/सामासु, दि. १४.०७.२०२४
- शासन निर्णय क्र.ज्येष्ठना-२०२४/प्र.क्र.१८९/सामासु, दि. ०८.०८.२०२४
- शासन निर्णय क्र.ज्येष्ठना-२०२४/प्र.क्र.१८९/सामासु, दि. १५.१०.२०२४

❖ **योजनेचा मुख्य उद्देश -**

महाराष्ट्र राज्यातील सर्व धर्मियांमधील ६० वर्षे वय व त्यावरील ज्येष्ठ नागरिकांना तीर्थ दर्शन यात्रेची मोफत संधी देण्यासाठी "मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना" राबविण्यात येत आहे.

❖ **योजनेच्या प्रमुख अटी -**

१) ज्येष्ठ नागरिक /लाभार्थी महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.
२) लाभार्थ्याचे वय ६० वर्षे पूर्ण असावे.
३) लाभार्थ्याचे कौटुंबिक वार्षिक उत्पन्न रु. २.५० लक्ष च्या मर्यादेत असणे आवश्यक आहे.

❖ **लाभाचे स्वरुप — (भारतातील तीर्थक्षेत्रे - ८८ , महाराष्ट्रातील तीर्थक्षेत्रे -१६१ एकूण २४९ तीर्थस्थळे)**

- निर्धारित तीर्थ स्थळांपैकी एका स्थळाच्या यात्रेकरिता पात्र व्यक्तीला एकवेळ लाभ
- प्रवास खर्चाची कमाल मर्यादा प्रती व्यक्ती रु.३००००/-

❖ **आवश्यक कागदपत्रे —**

१) ऑनलाईन अर्ज ( जवळच्या नातेवाईकाचा मोबाईल क्रमांकासह )
२) आधार कार्ड / रेशन कार्ड
३) महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र / रहिवास दाखला ( नसल्यास त्याऐवजी रेशन कार्ड / मतदार ओळखपत्र/ शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र/ जन्म दाखला)
४) सक्षम प्रधिकारी यांनी दिलेला कुटुंब प्रमुखांचा उत्पन्नाचा दाखला (वार्षिक उत्पन्न रु. २.५० लक्ष पर्यंत असणे अनिवार्य ) किंवा पिवळे / केशरी रेशनकार्ड
५) वैद्यकीय प्रमाणपत्र
६) पासपोर्ट आकाराचे २ फोटो
७) अटी व शर्तीचे पालन तसेच शासन निर्णयानुसार आचारसंहितेचे पालन करणेबाबतचे हमीपत्र
८) ७५ वर्षे पेक्षा जास्त वय असणा-या ज्येष्ठ नागरिकाने सहायक सह अर्ज सादर केलेला असल्यास सहायकाचे प्रतिज्ञापत्र

❖ **वेबसाईट तयार करणे** - महाराष्ट्र माहिती व तंत्रज्ञान महामंडळ

❖ **राज्य नोडल अधिकारी -** आयुक्त, समाज कल्याण , पुणे

❖ **योजनेची अंमलबजावणी -** जिल्हास्तरीय समिती (अध्यक्ष- पालकमंत्री)

❖ **योजनेचे सनियंत्रण व आढावा घेणेसाठी समिती -** राज्यस्तरीय समिती (अध्यक्ष- मा. मंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग)

## १५.राज्यातील तृतीयपंथीयांचे कल्याण व त्यांच्या हक्कांचे संरक्षण योजना

✦ **शासन निर्णय -**

- महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय दि.६.९.२०१४
- महिला व बालविकास विभाग शासन निर्णय दि. ३.१०.२०१७
- सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय दि. १३.१२.२०१८
- सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय दि. ११.०३.२०२४

✦ **योजनेचा उद्देश -**

- तृतीयपंथीय यांना कायद्याने निश्चित अशी ओळख करुन देणे / स्थान मिळवून देणे व त्यासाठी शासनाच्या विविध विभागांकडे पाठपुरावा करणे.
- तृतीयपंथीयांना सामाजिक संरक्षण प्राप्त करुन देणे व समाजाच्या मुख्य प्रवाहामध्ये सामावून घेणे.
- तृतीयपंथीयांच्या मानवी हक्कांची पायमल्ली होऊ नये यासाठी उपाययोजना करणे.
- तृततीयपंथीयांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून देणे व त्यांचा आर्थिक तथा सांस्कृतिक विकास घडवून आणणे.
- तृतीयपंथीयांच्या विकासासाठी त्यांना संघटीत करण्याकरीता प्रयत्न करणे.

✦ **लाभाचे स्वरुप -**

- National Portal For Transgender Persons -https: transgender.dosje.gov.in या राष्ट्रीय पोर्टलव्दारे तृतीयपंथीय व्यक्तींना तृतीयपंथीय असलेबाबतचे प्रमाणपत्र व ओळखपत्र उपलब्ध करुन देणे.
- तृतीयपंथीय घटकांना सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व आर्थिक सुविधा उपलब्ध करुन देणे.
- तृतीयपंथीय बालकांना कुटुंबाबाहेर सोडले जाऊ नये, याकरीता तृतीयपंथीय घटकांसाठी काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने समाजात जनजागृती निर्माण करणे.
- तृतीयपंथीय घटकांना रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देणे.
- तृतीयपंथीयांना गुन्हेगारीपासून परावृत्त करण्याच्या दृष्टीने पोलीस विभागाला संवेदिन करणे आणि मंडळ वेळावेळी ठरवेल असे फायदे उपलब्ध करुन देणे.

✦ **महाराष्ट्र राज्याचे तृतीयपंथीयांसाठी धोरण २०२४ –**

- विविध योजनांना संबंधित प्रशासकीय विभागामार्फत विवक्षित पध्दतीने स्वतंत्र मान्यता, तसेच निधी मिळविणे गरजेचे गरजेचे राहील, तसेच योजनांची प्रत्यक्ष अंमलबजावणीपूर्वी यथास्थिती बदल करणे आवश्यक राहील, असे निर्देश दिलेले आहेत.
- केंद्र शासनाचा तृतीयपंथीयांचे हक्कांचे संरक्षण व अधिनियम, २०१९ अंतर्गत केंद्र शासनाने निर्गमित केलेले तृतीयपंथीयांचे हक्कांचे संरक्षण व कल्याण नियम, २०२० जशास तसे स्वीकृत करण्यात मान्यता.
- अंमलबजावणीसाठी संबंधित सर्व प्रशासकीय विभागांनी समन्वय अधिकाऱ्याची नियुक्ती करावी, असे निर्देश दिले आहेत.

✦ **तृतीयपंथीय हक्कांचे संरक्षण व कल्याण मंडळ (राज्यस्तर व विभागीय स्तर) व जिल्हास्तरीय तक्रार निवारण समिती –**

| **समिती** | **अध्यक्ष** | **सचिव** |
|---|---|---|
| राज्यस्तर | मा. मंत्री , सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग | आयुक्त, समाज कल्याण |
| विभागीय स्तर | विभागीय आयुक्त | प्रादेशिक उपायुक्त |
| जिल्हास्तर | जिल्हाधिकारी | सहायक आयुक्त |

✦ **संपर्क**

संबंधित जिल्ह्याचे सहायक आयुक्त, समाजकल्याण

- **तृतीयपंथीयांकरीता प्रस्तावित योजना -**

१. तृतीयपंथीय या समाज घटकांसाठी विभागीय स्तरावर आधार आश्रम.
२. तृतीयपंथीय या समाज घटकांतील लाभार्थ्यांना बीज भांडवल योजना.
३. तृतीयपंथीय या समाज घटकांतील लाभार्थ्यांना आरोग्य वाहिनी (Mobile Clinic) योजना.
४. राज्यातील तृतीयपंथीयांचे हक्कांचे संरक्षण व कल्याण योजनेंतर्गत तृतीयपंथीयांसाठी महामंडळाचा मसूदा (१) तृतीयपंथीयांसाठी महामंडळ स्थापन करणे व त्यांना संरक्षण मिळण्याकरीता महामंडळाचे सक्षमीकरण करणे (२) तृतीयपंथीय महामंडळाचा संस्थापन समयलेख आणि संस्थापन नियमावली.
५. अभिनव घरकूल योजनेंतर्गत तृतीयपंथीयांना अल्प उत्पन्न गट अंतर्गत सदनिका उपलब्ध करुन देणे.
६. तृतीयपंथीयांसाठी राज्यस्तरीय कार्यालय सुरु करणे.
७. तृतीयपंथीयांच्या समस्या व तक्रारी सोडविण्यासाठी हेल्पलाईन सुरु करणे.
८. तृतीयपंथीयांसाठी घरकुल योजना.
९. तृतीयपंथीयांसाठी आरोग्य विमा योजना.
१०. राज्यातील शासन मान्यता प्राप्त खाजगी विनाअनुदानीत व कायम विनाअनुदानीत शिक्षण संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या तृतीयपंथीय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती (फ्रीशीप)
११. राज्यातील २५ तृतीयपंथीय विद्यार्थ्यांना देशातील शैक्षणिक संस्थांमध्ये उच्च शिक्षण देण्यासाठी शिष्यवृत्ती .
१२. राज्यातील १० तृतीयपंथीय विद्यार्थ्यांना विशेष अध्ययन करणेसाठी परदेश शिष्यवृत्ती योजना.
१३. विभागीय स्तरावर शिक्षण घेणाऱ्या तृतीयपंथीय विद्यार्थ्यांसाठी शासकीय वसतीगृह सुरु करणे.
१४. तृतीयपंथीयांसाठी जिल्हास्तरावर / विभागीय स्तरावर व राज्यस्तरावर क्रिडा स्पर्धांचे आयोजन करणे.
१५. तृतीयपंथीयांना सरकारी नोंकरीमध्ये १ टक्का आरक्षण देणे.

- **ओळखपत्र व प्रमाणपत्र -**

National Portal For Transgender Persons या राष्ट्रीय पोर्टलव्दारे तृतीयपंथीय व्यक्तींना प्रमाणपत्र व ओळखपत्र मिळणेसाठी **एकूण ५००६ अर्ज प्राप्त झाले असून त्यापैकी ३८१६ तृतीयपंथीयांना प्रमाणपत्र व ओळखपत्र निर्गमित** करण्यात आले आहेत.

## १६.हाताने मैला उचलण्याचे काम करुन घेण्यास प्रतिबंध करणे व त्यांचे पुर्नवसन करण्याबाबत अधिनियम २०१३

**राज्य पुरस्कृत**

**शासन निर्णय**

- हाताने मैला उचलणा-या सफाई कर्मचा-यांच्या सेवायोजनेस प्रतिबंध आणि त्यांचे पुनर्वसन अधिनियम,2013
- शासन निर्णय दि. 7 ऑगस्ट, 2015
- शासन निर्णय सामाजिक न्याय विभाग दि. 11 जून, 2019
- सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्र. हामैऊ-2019/प्र.क्र.358 /अजाक दि. 12 डिसेंबर, 2019

**योजनेचा मुख्य आदेश**

हाताने मैला उचलण्याचे काम करुन घेण्यास प्रतिबंध करणे व त्यांचे पुर्नवसन करणे

**लाभाचे स्वरुप / अधिनियमातील तरतूदी**

- अनारोग्यकारी शौचालये बांधण्यास प्रतिबंध अनारोग्यकारी शौचालयांचा सर्वे करुन ते आरोग्यकारी शौचालयात रुपांतर करणे.
- मॅन्युअल स्कॅव्हेजर्सचा शोध घेवुन त्यांची नोंद करणे आणि त्यांचे पुर्नवसन करणे.
- मलनि:स्सारण वाहिन्या आणि सेप्टीक टँक याची घातक सफाई करण्यास प्रतिबंध.
- मलनि:स्सारण वाहिन्या आणि सेप्टीक टँक यांची यांत्रिक पध्दतीने सफाई करणे.
- मॅन्युअल स्कॅव्हेजर्सच्या पुर्नवसनाची जबाबदारी जिल्हा दंडाधिकारी यांची आहे.
- नुकसान भरपाई एक रकमी देण्याची तरतुद.
- घर बांधण्यासाठी जागा आणि वित्तीय सहाय /तयार घर उपलब्ध करुन देणे.
- व्यावसायिक प्रशिक्षण आणि पर्यायी निर्वाहासाठी सवलतीच्या दरात कर्ज उपलब्ध.
- अनारोग्यकारी शौचालये बांधणे आणि मॅन्युअल स्कॅव्हेजर्सचे काम करायला लावणे दंडनिय अपराध आहे.
- अनारोग्यकारी शौचालयांचा आणि हाताने मैला उचलणा-या सफाई कामगारांचा सर्वे स्थानिक स्वराज्य संस्थांनी करावयाचा आहे.
- सन 1993 पासुन हाताने मैला उचलण्याचे काम करतांना मृत पावलेल्या मॅन्युअल स्कॅव्हेजर्सच्या वारसांना रु.10 लाखाची मदत तात्काळ देण्याची तरतुद
- विशेष व्यवस्थापन कक्षाची स्थापना करणे.
- कल्याणकारी योजना प्रभावी पणे अंमलात आणणे.
- जगजागृती कार्यक्रम हाती घेणे.

**संपर्क**

संबंधित जिल्हयाचे सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण

## १७.अंधश्रध्दा निर्मुलन अधिनियमाची अंमलबजावणी

**राज्य पुरस्कृत**

**शासन निर्णय**

- महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादुटोणा यांना प्रतिबंध घालण्याबाबत व त्यांचे समुळ उच्चाटन करण्यासाठी अधिनियम, 2013
- शा.नि.क्र. अंश्रनि-2014/प्र.क्र.293/सामासू, दि.12/8/2014
- शा.नि.क्र. अंश्रनि-2014/प्र.क्र.293/सामासू, दि.12/9/2014
- शा.नि.क्र. अंश्रनि-2016/प्र.क्र.330/सामासू, दि.5/1/2017
- शासन निर्णय दिनांक 15 जुलै 2020
- शासन निर्णय दिनांक 2 मार्च, 2022

**योजनेचा मुख्य उद्देश**

महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादुटोणा यांना प्रतिबंध घालण्याबाबत व त्यांचे समुळ उच्चाटन करणे

**अपराधासाठी शिक्षा**

सहा महिने ते सात वर्षापर्यंत कारावास आणि रुपये पाच हजार ते पन्नास हजार रुपयांपर्यंत द्रव्यदंड.

**गुन्ह्याचे स्वरुप**

'दखलपात्र' व 'अजामीनपात्र'

- **व्याख्या :-**
  एखाद्या व्यक्तीने, समाजाची घडी विस्कटून टाकण्याच्या दृष्टीने भोंदू लोकांनी सर्वसामान्यत: जादूटोणा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या तथाकथीत अलौकिक शक्तीच्या किंवा भूत पिशाच्च यांच्या नावाने निर्माण झालेल्या सर्व बाबी या कृतीपैकी कोणतीही कृती स्वत: करणे, किंवा इतर कोणत्याही व्यक्तीकडून करवून घेणे, किंवा त्या कृती करण्यास इतर कोणत्याही व्यक्तीला प्रवृत्त करणे असा आहे.
- खटला चालविण्याचे अधिकार :- महानगर दंडाधिकारी किंवा प्रथम वर्ग, न्यायदंडाधिकारी व त्याच्यापेक्षा वरीष्ठ दर्जाचे न्यायालय.
- दक्षता अधिका-याची नेमणूक :- प्रत्येक पोलिस ठाण्यात पोलीस निरिक्षकापेक्षा कमी दर्जा नसलेल्या पोलिस अधिका-याची दक्षता अधिकारी म्हणून नियुक्ती करणे अपेक्षित आहे. या अधिका-यास कोणत्याही ठिकाणी प्रवेश करणे, झडती घेणे, इत्यादी अधिकार आहेत.
- शासन निर्णय दिनांक 2 मार्च, 2022 अन्वये मा.मंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांच्या अध्यक्षतेखाली जादूटोणा विरोधी कायदा जनजागृती प्रचार आणि प्रसार कार्यक्रम अंमलबजावणी समिती (PIMC) पुनर्रचना करण्यात आली आहे.

**संपर्क**

संबंधित जिल्हयाचे सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण

## १८.अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे.

**राज्य पुरस्कृत योजना**

**शासन निर्णय**

- शासन निर्णय क्र.एसीडब्ल्यू-1074/58-व्ही, दिनांक 14 जुन 1974.
- शासन निर्णय क्र.दवसू-2011/प्र.क्र.442/अजाउयो, दिनांक 5 डिसेंबर, 2011.
- शासन निर्णय क्र. दवसू-2013/प्र.क्र. 85/अजाक-1, दि. 1/08/2013.
- शासन निर्णय क. दवसु-2015/प्र.क्र.59/अजाक-1, दि. 27/5/2015
- शासन निर्णय क्र. विघयो-2010/प्र.क्र.26/विघयो, दि. 13/4/2017
- शासन निर्णय क्र. संकीर्ण-2021/प्र.क्र.79/अजाक, दिनांक 6/10/2021

**योजनेचा मुख्य उद्देश**

अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांचे राहणीमान सुसहय व्हावे, राहणीमानात सुधारणा व्हावी.

**योजनेच्या प्रमुख अटी**

अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्ती (लोकसंख्यानिहाय अनुदान मंजूर करण्यात येते)

**लाभाचे स्वरूप**

अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्त्यांमध्ये पायाभूत सुविधा उदा. पाणी पुरवठा, मलनि:सारण, जोड रस्ते, अंतर्गत रस्ते, विज पुरवठा व समाज मंदिर, संविधान सभागृहाचे बांधकाम करणे, पेव्हर ब्लॉक, इ. सोईसुविधा उपलब्ध करुन देणेसाठी प्राधान्यक्रमाने कामांसाठी खालीलप्रमाणे लोकसंख्येच्या प्रमाणात अनुदान देणेत येते.

| क्र. | वस्तींची लोकसंख्या | अनुदानाची रक्कम (लाखात) (शा.नि. 5 डिसेंबर 2011) | अनुदानाची रक्कम (सुधारीत) (शा.नि. 6 ऑक्टोबर 2021) |
|---|---|---|---|
| 1 | 10 ते 25 | 2.00 | 4.00 |
| 2 | 26 ते 50 | 5.00 | 10.00 |
| 3 | 51 ते 100 | 8.00 | 16.00 |
| 4 | 101 ते 150 | 12.00 | 24.00 |
| 5 | 151 ते 300 | 15.00 | 30.00 |
| 6 | 301 च्या पुढे | 20.00 | 40.00 |

**संपर्क**

संबंधित जिल्हयाचे समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद

## १९.भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना

**राज्य पुरस्कृत**

**शासन निर्णय**

- शासन निर्णय क्र.दवसू-2015/ प्र.क्र.347/अजाक, दि. 9/3/2018
- शासन शुध्दीपत्रक दिनांक 28 जुलै, 2021
- शासन निर्णय दिनांक 30 सप्टेंबर, 2021
- शासन निर्णय दिनांक 8 ऑक्टोबर, 2021

**योजनेचा मुख्य उद्देश**

राज्यातील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या नागरी व ग्रामीण भागातील वस्ती / गावांचा विकास करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या कामांना शासन स्तरावरुन मान्यता देऊन या योजनेअंतर्गत घ्यावयाची कामे , अंमलबजावणी यंत्रणा व इतर निकष निश्चित करणे.

**योजनेच्या प्रमुख अटी**

लोकप्रतिनिधी म्हणून केवळ विद्यमान खासदार, आमदार व स्थानिक स्वराज्य संस्थेचे सर्व सदस्य व पदाधिकारी यांचे शिफारशीसह प्राप्त प्रस्ताव

**लाभाचे स्वरूप**

अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्त्यांमध्ये पाणीपुरवठा, मलनि:सारण, पोहोचरस्ते, अंतर्गत रस्ते, सार्वजनिक शौचालये, गटारे, समाजमंदिरे, वाचनालये, स्मशानभुमीचा विकास, व्यायामशाळा, पर्जन्य पाण्याचा निचरा, वाचनालय, अभ्यासिका, धम्म केंद्र, विपश्यना केंद्र इत्यादी कामे

(प्रत्येक काम रु.1.00 कोटी ते रु.15.00 कोटी अनुदानाच्या मर्यादेत)

**संपर्क**

संबंधित जिल्हयाचे सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण

## २०.राजर्षि छत्रपती शाहु महाराज यांचा जन्मदिवस दिंनाक २६ जुन दरवर्षी “सामाजिक न्याय दिन” म्हणून साजरा करणे

**राज्य पुरस्कृत**

**शासन निर्णय**

- शासन निर्णय क्र. संकिर्ण-2002/प्र.क्र.258/मावक-2, दि. 14 जुलै, 2003.
- शासन निर्णय क्र. संकिर्ण-2006/प्र.क्र. 186/मावक-2, दि. 28 एप्रिल, 2006.
- शासन निर्णय क्र. बीसीएच-2015/प्र.क्र.135/बांधकामे, दि. 22 जुन, 2015.

**योजनेचा मुख्य उद्देश**

मागासवर्गीय , दिव्यांग, वृध्द, निराधार , दुर्बल इत्यादी घटकांच्या कल्याणार्थ राजर्षि छत्रपती शाहु महाराज यांनी अनेक निर्णय अंमलात आणले , त्याचाच आदर्श समाजापुढे विशेषत्वाने यावा या दृष्टीकोनातून राजर्षि छत्रपती शाहु महाराज यांचा जन्मदिवस दि.26 जून दरवर्षी सामाजिक न्याय दिन म्हणून साजरा करण्यात येतो.

**लाभाचे स्वरुप**

- जिल्हा व तालुकास्तरावर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते.
- सामाजिक न्याय दिनाच्या दिवशी सामाजिक न्याय विभागाच्या योजनांमधील लाभार्थ्यांना लाभाचे वितरण करण्यात येते.

**संपर्क**

संबंधित जिल्हयाचे सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण

## २१.मागासवर्गीय सहकारी गृहनिर्माण संस्थांना अनुदान

**राज्य पुरस्कृत**

**शासन निर्णय**

- शासन निर्णय क्र.बीसीएच-1096/प्र.क्र.619/मावक-2,दि.1 एप्रिल, 1998
- शासन निर्णय क्रं. गृहनि- 2023/ प्र.क्र.16/ बांधकामे दि. 31 मे, 2023

**योजनेचा मुख्य उद्देश**

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या जमाती या प्रवर्गातील मागासवर्गीय व्यक्तींना कायमस्वरुपी निवारा उपलब्ध व्हावा, कुटूंब एकाच ठिकाणी सुस्थितीत व सुरक्षित रहावे व लाभार्थीना सर्व प्रकारच्या मुलभूत सोयी सुविधा उपलब्ध होणे

**योजनेच्या प्रमुख अटी**

- मुळ मागासवर्गीय सहकारी गृहनिर्माण (PWR - 219) या योजनेंतर्गत असलेल्या संस्थांमध्ये मागासवर्गीय 90 टक्के व अमागासवर्गीय 10 टक्के हे प्रमाण पूर्वीच्या शासन निर्णयानुसार जैसे थे ठेवून पुर्नविकासानंतर निर्माण होणाऱ्या अतिरिक्त सदनिकांमध्ये मागासवर्गीयांचे प्रमाणे 20 टक्के व अमागासवर्गीयांचे प्रमाण 80 टक्के राहील.
- पुर्नविकासाकरिता प्राप्त होणारे सर्व प्रस्ताव म्हाडामार्फत सामाजिक न्याय विभागाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येतील.

**लाभाचे स्वरुप**

- जमीन अनुदान – संस्थेची जमीन खाजगी असल्यास नगररचनाकार यांनी निश्चित करुन दिलेली किंवा खरेदीची किंमत यापैकी कमी असलेली रक्कम अर्थसहाय्य
- नोंदणी शुल्क – मुद्रांक शुल्क भरण्यापासून सुट
- विकास निधी – लागू असल्यास शासनाकडून भरणा करण्यात येईल
- बांधकाम अनुदान– बांधकाम खर्चाच्या 30% बांधकाम अनुदान
- व्याज अनुदान – निकषांनुसार लाभार्थ्यंने घेतलेल्या कर्जावर शासनाकडून 10% व्याजाचे अनुदान

**संपर्क**

संबंधित जिल्हयाचे सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण

## २२. डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार

**शासन निर्णय**

- शासन निर्णय दि. 19/12/21985
- शासन निर्णय दि. 20/02/1989
- शासन निर्णय दि. 10/04/2000
- शासन निर्णय दि. 25/07/2001
- शासन निर्णय दि. 4/03/2025

**पुरस्कारासाठी पात्रतेच्या अटी व स्वरुप**

| पुरस्कार पात्र | संख्या | पात्रतेच्या अटी | लाभाचे स्वरुप |
|---|---|---|---|
| व्यक्ती | 51 (पैकी 20% स्त्रिया) | 1. अनुसूचित जाती , भटक्या जमाती यांचे कल्याणासाठी तसेच दिव्यांग कल्याण क्षेत्रात कार्यरत नामवंत व्यक्ती<br>2. सदर कामाचा 15 वर्षाचा अनुभव<br>3. पुरुष वय 50 वर्षे पुर्ण व स्त्री वय 40 वर्षे पूर्ण<br>4. एकापेक्षा जास्त वेळेस पुरस्कारास पात्र असणार नाही<br>5. निर्वाचित लोकप्रतिनिधी पुरस्कारास अपात्र | रु.0.75 लक्ष सन्मानपत्र, व स्मृतीचिन्ह |
| संस्था | 10 | 1. संस्था नोंदणी अधिनियम, 1860 अन्वये पंजीबद्ध असणे आवश्यक<br>2. संस्थेचे कार्य राजकारणापासून अलिप्त असावे.<br>3. संस्था समाज कल्याण क्षेत्रात भरीव कार्यरत असणे आवश्यक<br>4. संस्थेने सामाजिक क्षेत्रात किमान 10 वर्षाचा अनुभव | रु. 1.00 लक्ष सन्मानपत्र, व स्मृतीचिन्ह |

**समारंभाचा दिवस** – दिनांक 14 एप्रिल प्रतिवर्षी

**संपर्क**

संबंधित जिल्हयाचे सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण

## २३.साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे पुरस्कार

**शासन निर्णय**

- शासन निर्णय दि. 25/07/2003
- शासन निर्णय दि. 22/06/2010
- शासन निर्णय दि. 27/09/2013
- शासन निर्णय दि. 4/03/2025

**पुरस्कारासाठी पात्रतेच्या अटी व स्वरुप**

| पुरस्कार पात्र | संख्या | पात्रतेच्या अटी | लाभाचे स्वरुप |
|---|---|---|---|
| व्यक्ती | 25 (पैकी 30% स्त्रिया) | 1. मातंग समाजातील कलावंत व साहित्यिक<br>2. मातंग समाजाकरिता कला, साहित्य  क्षेत्रात कार्य करणारे नामवंत, कलावंत साहित्यिक  समाज सेवक<br>3. सामाजिक क्षेत्रात किमान 10 वर्षाचा अनुभव<br>4. पुरुष वय 50 वर्षे व स्त्री वय 40 वर्षे<br>5. एकापेक्षा जास्त वेळेस पुरस्कारास पात्र असणार नाही | रु. 0.50 लक्ष<br>सन्मानपत्र<br>व<br>स्मृतीचिन्ह |
| संस्था | 6 | 1. संस्था ही मुंबई सार्वजनिक विस्वस्त अधिनियम  1950 व संस्था नोंदणी अधिनियम, 1860 अंतर्गत नोंदणीकृत असावी.<br>2. समाज कल्याण क्षेत्रात मातंग समाजाच्या उन्नतीसाठी शिक्षण , आरोग्य , अन्याय निर्मुलन , अंधश्रध्दा , रुढी परंपरा, जनजागरण इत्यादी क्षेत्रात कार्यरत<br>3. मातंग समाजाच्या कल्याणासाठी 10 वर्षाहून अधिक मौलिक काम असावे.<br>4. संस्था राजकारणापासून अलिप्त असावे. | रु. 1.00लक्ष<br>सन्मानपत्र<br>व<br>स्मृतीचिन्ह |

**समारंभाचा दिवस** – दिनांक 1 ऑगस्ट प्रतिवर्षी

**संपर्क**

संबंधित जिल्हयाचे सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण

## २४.पद्मश्री कर्मवीर दादासाहेब गायकवाड पुरस्कार

**शासन निर्णय**

- शासन निर्णय दि. 09/10/2001
- शासन निर्णय दि.07/08/2004
- शासन निर्णय दि. 4/03/2025

**पुरस्कारासाठी पात्रतेच्या अटी व स्वरुप**

| पुरस्कार पात्र | संख्या | पात्रतेच्या अटी | लाभाचे स्वरुप |
|---|---|---|---|
| व्यक्ती | 1 | अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील भूमीहिन, शेतमजूर, व दुर्बल घटकांचे कल्याणासाठी झटणारे नामवंत समाज सेवक | रु. 0.50 लक्ष सन्मानपत्र व स्मृतीचिन्ह |
| संस्था | 1 | भूमीहिन शेतमजूर यांचे क्षेत्रात कार्य करणाऱ्या सामाजिक संस्था. | रु.1.00 लक्ष सन्मानपत्र व स्मृतीचिन्ह |

**समारंभाचा दिवस** – दिनांक 15 ऑक्टोबर प्रतिवर्षी

**संपर्क**
संबंधित जिल्हयाचे सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण

## २५. संत रविदास पुरस्कार

**शासन निर्णय**

- शासन निर्णय दि. 16/07/2004
- शासन निर्णय दि. 4/03/2025

**पुरस्कारासाठी पात्रतेच्या अटी व स्वरुप**

| पुरस्कार पात्र | संख्या | पात्रतेच्या अटी | लाभाचे स्वरुप |
|---|---|---|---|
| व्यक्ती | 1 | 1. चर्मकार समाज व दलित समाज इत्यादीचे सामाजिक दुर्बल घटकांचे कल्याणासाठी झटणारे नामवंत समाज सेवक<br>2. सामाजिक क्षेत्रात 15 वर्षाचा अनुभव<br>3. पुरुष वय 50 वर्षे व स्त्री वय 40 वर्षे<br>4. एकापेक्षा जास्त वेळेस पुरस्कारास पात्र असणार नाही<br>5. लोकप्रतिनिधी पुरस्कारास अपात्र | रु. 0.50 लक्ष<br>सन्मानपत्र<br>व<br>स्मृतीचिन्ह |
| संस्था | 1 | 1. संस्था ही मुंबई सार्वजनिक विस्वस्त अधिनियम 1950 व संस्था नोंदणी अधिनियम, 1860 अंतर्गत नोंदणीकृत असावी.<br>2. समाज कल्याण क्षेत्रात चर्मकार समाज व दलित समाजाच्या उन्नतीसाठी शिक्षण, आरोग्य, अन्याय निर्मुलन , अंधश्रध्दा रुढी निर्मुलन , जनजागरण इत्यादी क्षेत्रात कार्य करणा-या सामाजिक संस्था<br>3. समाज कल्याण क्षेत्रात किमान 10 वर्ष कार्यरत<br>4. संस्था राजकारणापासून अलिप्त असावे. | रु. 1.00 लक्ष<br>सन्मानपत्र<br>व<br>स्मृतीचिन्ह |

**समारंभाचा दिवस** – दिनांक 6 फेब्रुवारी प्रतिवर्षी

**संपर्क**
संबंधित जिल्हयाचे सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण

## २६. शाहू, फुले, आंबेडकर पारितोषिक

**शासन निर्णय**

- शासन निर्णय दि. 06/06/2005
- शासन निर्णय दि. 31/08/2012

**पुरस्कारासाठी पात्रतेच्या अटी व स्वरुप**

| पुरस्कार पात्र | संख्या | पात्रतेच्या अटी | लाभाचे स्वरुप |
|---|---|---|---|
| संस्था | 12 (एकुण 6 महसूल विभागातील प्रत्येकी 2) | 1. संस्था ही मुंबई सार्वजनिक विस्वस्त अधिनियम 1950 व संस्था नोंदणी अधिनियम, 1860 अंतर्गत नोंदणीकृत असावी<br>2. संस्थेने समाजातील अतिशय दुर्बल व मागासवर्गीय घटकातील व्यक्ती व समाजासाठी सेवा, शिक्षण, आरोग्य, पुनर्वसन, रोजगार इत्यादी क्षेत्रामध्ये कार्य केलेले असावे.<br>3. संबंधित क्षेत्रात किमान मागील 10 वर्ष कार्यरत | रु. 7.50 लक्ष सन्मानपत्र व स्मृतीचिन्ह |

**समारंभाचा दिवस** – दिनांक 26 जून प्रतिवर्षी

**संपर्क**

संबंधित जिल्हयाचे सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण

## २७.डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय प्राविण्य पुरस्कार

**शासन निर्णय**

- शासन निर्णय दि. 19/04/2018

**पुरस्कारासाठी पात्रतेच्या अटी व स्वरुप**

| पुरस्कार पात्र | संख्या | पात्रतेच्या अटी | लाभाचे स्वरुप |
|---|---|---|---|
| संस्था | 21 | 1. अ)अनुसुचीत जातीच्या मुलामुलींचे शासकीय वसतीगृहे,<br>ब)अनुसुचीत जातीच्या मुलांमुलींचे अनुदानित वसतीगृहे,<br>क) शासकीय दिव्यांग कल्याण संस्था<br>या प्रवर्गाच्या संस्था<br>2. अनुदानित दिव्यांग कल्याण संस्था<br>3. प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळविणारी संस्था पुढील ५ वर्षासाठी अपात्र | **राज्यस्तर**<br>प्रथम - 5 लक्ष<br>व्दितीय - 3 लक्ष<br>तृतीय - 2 लक्ष<br><br>**विभागीय स्तर**<br>18 पुरस्कार ( प्रत्येकी रु.1 लक्ष) |

**संपर्क**

संबंधित जिल्हयाचे सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण